प्रेसनोट दिनांक २४/०४/२०१९

मागील काही कालावधीत पुणे शहरामध्ये घडलेले गंभीर स्वरुपाचे गुन्हे त्यामध्ये घातक हत्यारांचा वापर करुन करण्यात आलेल्या गुन्हयांमधील सराईत गुन्हेगार ज्यामध्ये शरीराविरुध्द व मालाविरुध्दचे गुन्हे दाखल असलेले व यापुर्वीचे रेकॉर्डवरील असणारे आरोपींचा सहभाग असल्याचे दिसुन आले होते. तसेच लोकसभा सार्वत्रिक निवडणुक कालावधीत कोणताही अनुचित प्रकार घडु नये या अनुषंगाने मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे व मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर श्री. सुनिल फुलारी यांचे मार्गदर्शनाखाली, परिमंडळ 05 अंतर्गत असणारे हडपसर, मुंढवा, वानवडी, कोंढवा, मार्केटयार्ड, व बिबवेवाडी या पोलीस ठाणे हद्दीत पोलीस उप आयुक्त, परिमंडळ 05 श्री. प्रकाश गायकवाड यांनी एकाच वेळी **दिनांक 24/04/2019 रोजी पुणे शहर पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय व पुणे जिल्हा हददीतुन दोन (०२) वर्षा करीता तडीपार** करण्यात आले आहे.

(1) बिबवेवाडी पोलीस स्टेशनचे अभिलेखावरील सराईत गुन्हेगार नामे **सचिन उर्फ घारे आण्णा पांडुरंग सोंडकर** वय 30 वर्षे रा. 65/7, अप्पर इंदीरानगर, बिबवेवाडी, पुणे यास तडीपार आदेश क्रं. 07/2019 अन्वये.

(2) मुंढवा पोलीस स्टेशनचे अभिलेखावरील सराईत गुन्हेगार नामे **प्रशांत उर्फ परश्या अनिल पवार** वय 27 वर्षे रा. स. नं. 94, सर्वोदय कॉलनी, मुंढवा, पुणे यास तडीपार आदेश क्रं. 08/2019 अन्वये.

(3) हडपसर पोलीस स्टेशनचे अभिलेखावरील सराईत गुन्हेगार नामे **ऋषिकेश उर्फ चिंटया महेंद्र कांबळे** वय २३ वर्षे रा. स. नं. १७५, त्रिमुर्तीनगर, गणपती मंदीराजवळ, गंगानगर, फुरसुंगी, पुणे यास तडीपार आदेश क्रं. 09/2019 अन्वये दिनांक 24/04/2019 रोजी तडीपार करण्यात आले आहे.

सदरची **उच्चतम परीणामकारक प्रतिबंधक कारवाई** मा. पोलीस आयुक्त पुणे शहर यांच्या सुचनांप्रमाणे मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर श्री. सुनिल फुलारी यांचे मार्गदर्शनाखाली, **मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ 05 श्री. प्रकाश गायकवाड** यांनी केली आहे.

**(प्रकाश गायकवाड)**
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ –५
पुणे शहर

Scanned by CamScanner